**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र. : मुमाआ-२०२३/नों. क्र. ५३७६/२२/त. क्र. ६१/२३/०१**

**श्री. रियाज शेख**
बामणवाडा, सी.पी.डब्लू.डी.ऑफिस समोर,
एम.सी.छगला मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००९९.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) के/पुर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
म.न.पा. मुंबई इमारत, पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९.

**प्रथम अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पुर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
म.न.पा. मुंबई इमारत, पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९.

| | | |
|---|---|---|
| **तक्रारीचा दिनांक** | : | ३०.०४.२०२१ |
| **सुनावणीचा दिनांक** | : | **१०.०३.२०२३/२४.०३.२०२३** |
| तक्रारदार | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

**उक्त प्रकरणी दिनांक १०.०३.२०२३ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

तक्रारदार यांनी दि. २३.०७.२०१९ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.मुमाआ/नों.क्र.३८०५/१९/अ.क्र.९१५/२०/०१ नुसार गेलेक्शी स्टार फार्मा गाळा क्र. १०४ मध्ये करण्यात आलेली अनिधिकृत बांधकामावर वरिष्ठ मनपा अधिका-यांना केलेली तक्रार, त्यावर वरिष्ठ मनपा अधिका-यांनी दिलेले आदेश व सदर विषयावर करण्यात आलेली कार्यवाहीची माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि. ०७.०९.२०२० रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येते की, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना २० दिवसात स्पीड पोस्टाने नि:शुल्क देण्यात यावी.

तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि. ३०.०४.२०२१ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि. १८.०१.२०१९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अद्याप तक्रारदार यांना मिळालेली नसल्याचे सांगितले.

आजच्या सुनावणी तक्रारदार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. सदर तक्रारीची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **तक्रारीची पुनर्सुनावणी दिनांक २४.०३.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी तक्रारदार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: माहितीसह उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

आजच्या पुनर्सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) के/पूर्व विभाग, श्री. मंदार अशोक तारी उपस्थित आहे.

तक्रारकर्ता यांनी असे विशद केले की, ४ वर्षे होऊनसुध्दा जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. तसेच मा. मुख्य माहिती आयुक्तांच्या आदेशाचे अनुपालन देखील झाले नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) के/पूर्व विभाग, श्री. गोविंद हिराळे यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसात स्पष्टीकरण सादर करण्यात यावे की, अपीलकर्ता यांना अद्याप पर्यंत माहिती का देण्यात आलेली नाही व मुख्य माहिती आयुक्तांच्या आदेशाचे अनुपालन का झाले नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे सकृतदर्शनी उल्लंघन केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध या अधिनियमाच्या **कलम २०(१) व २०(२)** अन्वये कार्यवाही का करु नये. जर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे स्पष्टीकरण ३० दिवसात आयोगात प्राप्त झाले नाही तर त्यांना याबाबत काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक : २४.०३.२०२३**

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

*Pragati 24.03.2023*